नियमीत फौ. ख. क्र. ५७/२०२१
सरकार -वि.- सतिश व इतर
नि.क्र. ७५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सौ. शितल सतिश गुप्ता,
वय ४० वर्षे, व्यवसाय – काही नाही,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखते. आरोपी क्र.१ माझे पती आहे, आरोपी क्र.२ व ३ नंनद आहे, आरोपी क्र.४ माझी सासु आहे. माझे लग्न दि.२०.०२.२०१९ रोजी नागपूर येथे परंपरा लॉन वर्धमान नगर भंडारा रोड येथे झाले होते. लग्न झाल्यानंतर मी भाटापारा ता. बलोदा बाजार जि. बलोडा बाजार राज्य छत्तीसगढ येथे राहायला गेले. लग्ना नंतर त्यांनी मला थोडा थोडा त्रास देण्यास सुरुवात केली कारण त्यांना मुलगा पाहिजे होता व हुंडा पाहिजे होता. माझे पहिल्या गर्भाचा गर्भपात झालेला आहे त्यानंतर मला मुलगी झाली. त्यामुळे त्यांनी मला अधिक त्रास देण्यास सुरुवात केली. ते मला रोज मारहान करीत होते. दि.२५.१०.२०२० रोजी माझे पती सतीश गुप्ता, ननद शारदा गुप्ता, सुमन गुप्ता तिचा पती संजय गुप्ता, सरोज गुप्ता, तिचा पती रामकुमार गुप्ता व सासु विमलाबाई गुप्ता यांनी मला मारझोड केली. माझ्या पतीने मला हॉकी स्टीकने मारहान केली. त्यादिवशी त्यांनी मला संध्याकाळी हॉकी स्टीकने कमरेवर खूप मारहाण केली. त्यामुळे मला उभे राहता येत नव्हते. माझ्या नंनदेने मला मारहाण केली, माझ्या सासुने मला कपडे धुण्याच्या मोगरीने मारहाण केली. त्यांनी मला जेवन न देता रात्रभर खोलीमध्ये बंद करुन ठेवले होते. त्यावेळी माझी मुलगी तीन महिन्याची होती. तिलाही रात्रभर दुध पाणी काहीही दिले नाही. त्यामुळे ती रडत होती. त्यानंतर मी रात्री माझे भाऊ व आईला फोन केला ते माझ्याकडे त्वरीत येण्यास निघाले. त्यानंतर माझे आई वडील व भाऊ आला त्यांनी माझ्या रुमचा दरवाजा उघडला व मला चहा पाणी दिले. त्यांनी आरोपींना समजाविण्याचा प्रयत्न केले असता आरोपींनी माझ्या भावाला मारहाण केली व शिवीगाळ केली. माझ्या नंनदेने माझ्या भावा विरुद्ध पोलीस स्टेशनला जाऊन खोटी फिर्याद दिली, परंतु, पोलीसांनी रिपोर्ट घेतली नाही.

२. त्यानंतर माझे आई वडील आरोपींना व मला समजावून, मला तिथेच सोडून निघून गेले. त्यानंतरही आरोपी माझ्यासोबत मारहान करत होते. त्यांनी माझे केस पकडून मारहाण केली. दि.२८.१०.२०२० रोजी माझे आई वडील व भाऊ परत आले व त्यांनी आरोपींची समजूत काढली, परंतु, ते ऐकायला तयार नव्हते व समजायलाही तयार नव्हते. त्यामुळे मी दि.२९.१०.२०२० रोजी माझ्या माहेरी परत आले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद देण्यास गेली त्यावेळी पोलीसांनी मला महिला सेल नागपूर येथे पाठविले. त्यानंतर महिला सेल यांनी आरोपींशी संपर्क करुन त्यांना नागपूर येण्यास सांगितले, परंतु, ते चारवेळा संपर्क करुनही ते महिला सेल येथे आले नाही. त्यामुळे मी दि.१०.०८.२०२१ रोजी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७६** देण्यात येते. आता मला दाखविलेले छापील प्रथम खबर अहवाल तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७७** देण्यात येते. पोलीसांनी माझे दोनवेळा बयान घेतले होते. दि.०४.११.२०२० रोजी पोलीसांनी मला ग्रामीण रुग्लाणय येथे वैद्यकीय तपासणी करिता नेले होते.

सर तपास संपला.

**<u>नि.क्र.७८ वरील आदेशावरुन उलट तपास तहकुब करण्यात येते.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १७.०६.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.